अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने या कार्यालयातील ३ अस्थायी पदांना दि.१.३.२०१८ ते ३०.९.२०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र.मावज-२०१८/१६८/प्र.क्र.४७/का.३४-अ

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- १४ मार्च , २०१८.

संदर्भ :- १) संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई यांचे दि.५ मार्च,२०१८ चे पत्र.

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि. ५ मार्च, २०१८.

शासन निर्णय:-

वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथे नमूद दि.५ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि. १.३.२०१८ ते दि. ३०.९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

२. वित्त विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना दिलेल्या अधिकारानुसार सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाकरीता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिनस्त अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने या कार्यालयातील खालील नमूद ३ अस्थायी पदांना दि.१.३.२०१८ पासून दि.३०.९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	**पदनाम**	**पदसंख्या**
१	चतुर्थश्रेणी कर्मचारी (शिपाई)	१
२	अर्धवेळ स्वच्छक	२
	एकूण	**३**

३. प्रस्तुत पदांवर होणारा खर्च कार्यालयातील इतर पदांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची पडतात त्या लेखाशीर्षाखाली त्या-त्या वित्तिय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक., दि. ८ जानेवारी २०१८ या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१४१६४९०६५९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.03.14 16:49:22 +05'30'

(रा. ना. मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालक, मंत्रालय, मुंबई,
२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई,
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६) संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई,
७) संचालक (माहिती)(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई,
८) उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
९) अधिपरिक्षक पुस्तके व प्रकाशने, मुंबई
१०) वित्त विभाग/व्यय-४/अर्थसंकल्प-१३/आपुक
११) नियोजन विभाग/योजना-१६,
१२) सामान्य प्रशासन विभाग/का.क्र.२५,३४,
१३) निवड नस्ती.